## पर्यावरण दिन व जीविधता महोत्सव २०१८ निमित्त आयोजित खुली छायाचित्र स्पर्धा

महाराष्ट्र वन विभाग; पुणे महानगरपालिका; बायोस्फिअर्स; मॉडर्न कॉलेज, गणेशखिंड; भारतीय वनस्पती सर्वेक्षण, पुणे व समर्थ भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ जून ते ६ जून २०१८ दरम्यान जीविधता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाच्या निम्मिताने खालील दोन स्वतंत्र विषयांवर सर्वांसाठी खुल्या छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**विषय**: १. "दख्खनच्या पठारावरील जैवविविधता"
२. "प्लास्टिक प्रदूषण समस्या व त्यावरील उपाय"

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी छायाचित्रकारांनी काढलेले फोटो दिनांक २ जुन २०१८, सायंकाळी ७ वाजेपर्यंत सॉफ्टकॉपी स्वरूपात (जे.पी.जी. / टीफ फॉर्मेटमध्ये), १२ x १८ इंच या आकारात किमान ३०० डी.पी.आय. असलेली जास्तीत जास्त प्रत्येकी ५ छायाचित्रे खालील ई मेल वर पाठवावीत.

**ई मेल**: **wedpune2018@gmail.com**

तसेच प्रत्यक्ष सॉफ्टकॉपी सादर करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत दिनांक २ जुन २०१८ पर्यंत वनसंरक्षक, वन्यजीव विभाग, पुणे, तिसरा मजला; सामाजिक वनीकरण, पुणे, दुसरा मजला, वनभवन, भाम्बुर्डा, गोखलेनगर, पुणे तसेच उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे, सेनापती बापट रोड, पुणे या कार्यालयात सादर करावीत. तज्ञांनी निवडलेल्या विजेत्या व निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन, निमंत्रित प्रसिद्ध वन्यजीव छायाचित्रकारांच्या छायाचित्रांसमवेत दिनांक ५ जून ते ६ जून २०१८ दरम्यान पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र (राजा रवी वर्मा कलादालन), घोले रोड, पुणे येथे प्रदर्शित केले जाईल. विजेत्या स्पर्धकांना शासनातर्फे प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व प्रोत्साहनात्मक पारितोषिके देण्यात येणार आहेत. विजेत्या छायाचित्रांच्या निवडीबाबतचा परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील याची कृपया सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी.

स्पर्धेच्या नियमांसाठी व अधिक माहितीकरिता ९९२३३६७४५२ (मॉडर्न कालेज, गणेशखिंड, पुणे) / ९५०३०९६४६९ (बायोस्फिअर्स, पुणे) / ०२०-२५६६३०१७, ८६०५९५९६८४ (सामाजिक वनीकरण विभाग, पुणे) / ०२०-२५६६८०००, ९४२३०११६८६ (पुणे वन्यजीव विभाग) / ९६०४८४८१२३ (पुणे वनविभाग, प्रादेशिक) / ९९२२७४११७४ (भारतीय वनस्पती सर्वेक्षण)/ ९३७३०५५५६० (समर्थ भारत)/ ९६८९९३१८३२ (पुणे महानगरपालिका, पुणे) यांच्याशी संपर्क साधावा.